Maharashtra State Board Of
Secondary & Higher Secondary
Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर- ४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :( O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क्र./लाविमं/उमाक/2038
दिनांकः– 15/12/2025.

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक
विद्यालये/कनिष्ठ महाविद्यालये,
लातूर/नांदेड/धाराशिव.

**विषयः**– फेब्रु/मार्च 2026 माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) विद्यार्थ्यांचा APPAR ID नोंदवून घेणेबाबत.
**संदर्भः**– जा.क्र./रा.मं/गणकयंत्र–112/4320 दिनांक 27/11/2025.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) फेब्रुवारी/मार्च 2026 ला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना निकालाचे वेळी Digilocker मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका उपलब्ध करून द्यावयच्या आहेत. त्याकरीता विद्यार्थ्यांच्या APPAR ID ची नोंद आवश्यक आहे. APPAR ID द्वारे प्राप्त गुणपत्रिकाचे विद्यार्थ्यांना होणारे लाभ पुढील प्रमाणे आहेत.

1. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेचे कायमस्वरूपी Digital Record तयार होऊन सर्व शैक्षणिक गुणपत्रिका एकत्रित उपलब्ध होतात.
2. वेगवगळया शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश प्रकिया सुलभ होते. शैक्षणिक संस्था/नियोक्ते त्वरीत पात्रता पडताळणी करू शकतात. भौतिक कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाहीशी होते.
3. सरकारी शिष्यवृत्ती व योजनामध्ये लाभ मिळणे सुलभ होते.
4. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी कोठुनही उपलब्ध होतात.
5. केंद्रीकृत आणि सुरक्षित प्रणालीमुळे कागदपत्रे हरवण्याचा धोका नाही.

त्यामुळे आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा APPAR ID उपलब्ध करून त्याची नोंद मंडळाचे संकेतस्थळ www.mahahsscboard.in वर करण्यात यावे. आपल्या विद्यालयातील/कनिष्ठ महाविद्यायातील सर्व विद्यार्थ्यांचे APPAR ID ची नोंद करून घेण्यात यावी. व सूचना फलकावर मोठया अक्षरात APPAR ID च्या नोंदीचे फायदे डकवावेत.

विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ,लातूर.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः–
मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव,
१. शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग लातूर
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद कार्यालय, लातूर/नांदेड/धाराशिव. आपणास कळविण्यात येते की, आपल्या स्तरावरून सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना उपरोक्त बाबीची अमलबजावनी करिता कळविण्यात यावे.